महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

OW/DCP TRAFFIC/ADM/NOTIFICATION/ १०० /2022 DATE :- १८ /10/2022

## "वाहतूक नियंत्रण अधिसूचना"

**संदर्भ :–** १) जा.क्र. कडोंमपा/३कप्रक्षे/अबानि/५३०, दि. ०८/१०/२०२२.
२) डोंबिवली वाहतूक उपविभागाकडील जा.क्र. ६१७/२०२२, दि. १७/१०/२०२२.
३) सपोआ कल्याण वाहतुक विभागाकडील जा.क्र. ७२१/२०२२, दि. १७/१०/२०२२

*****

**ज्याअर्थी,** कल्याण वाहतूक उपविभागाचे हद्दीमध्ये कल्याण पश्चिमेस कुंभारवाडा, गजा हॉटेल, अहिल्याबाई चौक कल्याण येथील रामजी जीवा मेन्शन ही अतिधोकादायक इमारत दि. १९/१०/२०२२ रोजी सकाळी १०:०० ते दि. २०१/१०/२०२२ रोजी २०:०० वाजे पावेतो या कालावधीत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमार्फत निष्कासीत करण्यात येणार आहे.

**ज्याअर्थी,** निष्कासीत करण्यात येणारी रामजी जीवा मेन्शन ही इमारत अहिल्याबाई चौक व शंकरराव चौक मार्गावर असल्याने सदर ठिकाणी होणारी वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक आहे. निष्कासीत करते वेळी लोकांची गर्दी होवू नये अगर सदर ठिकाणी काही अपघात होवू नये, या कारणास्तव दि. १९/१०/२०२२ रोजी सकाळी १०:०० ते दि. २०/१०/२०२२ रोजी २०:०० वाजे पावेतो सदर रस्त्यावर व परिसरात वाहतुक कोंडी होवू नये सदर भागात वाहतुक सुरळित व सुनिश्चित रहावी, याकरीता आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी दत्तात्रय कांबळे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय १, ठाणे शहर अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद –** १) कल्याण शहरातुन गांधीचौक, दुधनाका, पारनाका, टिळकचौक, व अहिल्याबाई चौक कडुन शिवाजी चौक दिशेने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना अहिल्याबाई चौक येथे "**प्रवेश बंद**" करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने ही अहिल्याबाई चौक येथुन डावे बाजुस वळण घेवुन सहजानंद चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील किंवा टिळक चौक येथुन डावे बाजुस वळण घेवुन शु मॉल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) शिवाजी चौक कडुन शंकरराव चौक मार्गे वाहतुक करणा–या मध्यम व हलक्या वाहनांना शंकरराव चौक येथे "**प्रवेश बंद**" करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने ही शिवाजी चौक –शंकरराव चौक – कुंभारवाडा येथुन पुढे उजवे वळण घेवुन इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतुक अधिसचना दि. १९/१०/२०२२ रोजी सकाळी १०:०० ते २०/१०/२०२२ रोजी सायंकाळी २०:०० वाजेपावेतो इमारतीचे निष्कासन होई पावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

(दत्तात्रय कांबळे)
पोलीस उप आयुक्त,मुख्यालय ०१
अतिरिक्त कार्यभार
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

- मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
- मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
- मा. जिल्हाधिकारी, ठाणे
- मा. अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
- मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
- प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण.
- पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
- पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
- परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
- विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
- नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
- ठाणे पोलीस पत्रक

प्रत – पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.
प्रत – समन्वय अधिकारी,९ ए.एस.कक्ष,ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत – स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली वाहतूक उपविभाग.
कार्यकारी अभियंता,(विशेष प्रकल्प) कल्याण–डोंबिवली महानगरपालिका,कल्याण.
२/– आपणास विनंती करण्यात येते की,आपण मोटार वाहन कायद्याचे कलम ११६(१)(अ)(ब) अन्वये संबंधित ठिकाणी फलक लावणेबाबत आपले अधिनस्थ संबंधितांना आदेश निर्गमित होणेस विनंती आहे.

CamScanner